*Variorum, Multi- Disciplinary e-Research Journal*
*Vol.-01, Issue-III, February 2011*

# मराठी नियतकालिकांची परंपरा आणि कार्य

***डॉ. शारदा कदम आणि प्रा. राजेंद्र चौधरी:*** मराठी विभाग, दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर

वाङमय आणि नियतकालिक ह्या दोन गोष्टी संकृतदर्शनी जरी वेगळया वाटत असल्या तरी त्या परस्पर पुरक आहेत. या दोन्हीही गोष्टी ब्रिटिश राजवटीत भारतीय समाजजीवनात रूढ झालेल्या आहेत. त्यापूर्वी म्हणजेच प्राचीन आणि मध्ययुगीन काळापासून वाङमय निर्मिती होत असली तरी, नियतकालिके मात्र आढळून येत नाहीत. ब्रिटिश काळात मात्र मुद्रणकला आली. आणि माहिती लोकांपर्यंत पोहचण्याचे महत्वाचे साधन आले आणि यातीलच महत्वाचे साधन म्हणजे नियतकालिक होय.

### *नियतकालिकाची संज्ञा :*

‘‘जे प्रकाशन एकाच शीर्षकाखाली किमान एक आठवड्याच्या किंवा त्याहून अधिक कालावधीने सामान्यतः नियमितपणे प्रसिद्ध होते. त्यात अनेक लेखकांचे विविध विषयांवरचे किंवा प्रकाशन विशिष्ट विषयाला वाहिलेले असल्यास त्या एकाच विषयावरचे) साहित्य संकलित केलेले असते ते नियतकालिक अशी सर्वसाधारणपणे नियतकालिकाची व्याख्या करता येते.’’(१)

‘‘नियतकालिक म्हणजे ठराविक अंतराने उपलब्ध केले जाणारे वाङमय, त्यात तत्कालीन महत्वाचे तपशील असतात व काही चिरस्थायी महत्वाचे विषयही आलेले असतात. लौकिक घटना आणि त्यावरील भाष्य, काही स्फुट जीवनविचार, व्यवहारोपयोगी शास्त्रे आणि विद्या यांची माहिती इत्यादींनी या नियतकालिकांची जागा व्यापलेली असते. असाही एकच मजकूर त्या संख्येने, ठराविक वेळी आपल्या वाचकांना सादर करता येते. हे नियतकालिकाचे मुख्य काम असते.’’(२)

### *नियतकालिकांची प्रारंभीची स्थीती :*

मुद्रण कलेचे व वृत्तपत्राचे उगमस्थान "चीन" मानले जात असले तरी त्याची खरी प्रगती युरोपियन राष्ट्रात झाली. या बाबत रा. गो. कानडे म्हणतात, "युरोपातील मुद्रण कलेच्या संस्थापनेचे पहिले वर्ष कोणते हे अद्यापही निश्चित झालेले नाही. तरी, पण जर्मनीतील मेंझ या लहानशा गावात "गेटबर्ग" ते आपला छोटा छापखाना १४४० मध्ये सुरूकेला. हेच वर्ष मूद्रण संस्थेचे प्रारंभ वर्ष आहे असे धरण्यात येते. आणखी दोन वर्षांनी जर्मनीत मुद्रण संस्थेचा पंचम शताब्दी महोत्सव संदेश जनतेस प्रस्तुत करण्यासाठी बायबल छापून काढून



www.gjhrws.in

*Variorum, Multi- Disciplinary e-Research Journal*
*Vol.-01, Issue-III, February 2011*

तेव्हाच आपण कृतकृत्य होऊ अशी त्यास आशा होती. सुदैवाने गटेनबर्गच्या कल्पनासृष्टीतील सुखस्वप्न सत्य ठरले आणि त्याच्या मरणापूर्वी १४५६ मध्ये टाईपवर "बायबल" छापलेले पहाण्याचे महदभाग्य त्याला लाभले. अशा प्रकारे मुद्रणारंभ जर्मनीत झाला. पाच दहा वर्षांनी ही कला इंग्लंडमध्ये गेले व १४७७ मध्ये लंडन शहरी कॅक्सटनने पहिले इंग्रजी पुस्तक टाईपवर छापल. यानंतर बरोबर १०० वर्षांनी हिंदुस्थानात मल्याळी व तामिळी अक्षरे कोचीन मधील मिशन छापखान्यात पाडण्यात आली.''[३]

जगभर ब्रिटिशांचे साम्राज्य पसरल्याने त्यांच्याबरोबर जगातील राष्ट्रामध्ये मुद्रणकला छापखाना आणि वृत्तपत्रे यांचाही प्रसार झाला. भारतातही त्यांची राजवट असल्याने येथे वृत्तपत्रे - नियतकालिके जन्माला येणे स्वाभाविकच होते.

***भारतातील नियतकालिकांचा उदय :***

भारतात १८१८ साली प्रथम बंगालमध्ये श्रीरामपूर मिशनच्या डॉ. विल्यम कॅरी यांनी "समाजदर्पण" नावाचे पहिले बंगाली साप्ताहिक आणि दिग्दर्शन नावाचे पहिले मासिक सुरू केलेले आढळून येते. बंगालनंतर गुजराती, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, ओरिसा, कर्नाटक यासारख्या प्रदेशामध्ये तेथील भाषेतील वृतपत्रे नियतकालिके प्रसिद्ध होऊ लागली.

***महाराष्ट्रातील नियतकालिकांचा उदय :***

महाराष्ट्रामध्ये १९३२ साली "दर्पण" नावाचे नियतकालिक बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केले. अर्थातच एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून मराठी भाषिकांना इंग्रजी भाषेचा आणि तीनमधील संपन्न विचारांचा जवळून परिचय होऊ लागला. देशातील इतर भाषांप्रमाणेच महाराष्ट्रात सांस्कृतिक प्रबोधनाची लाट निर्माण झाली. या प्रबोधनाचे एक प्रभावी साधन म्हणून वृत्तपत्रे व नियतकालिके हळूहळू सुरूझाली.

बाह्य जगातील माहिती देण्यासाठी आणि ज्ञानाच्या वाटा मोकळ्या करण्यासाठी त्यावेळची पिढी झपाटून गेली असल्याने त्यांच्या हातून पुढे मराठी नियतकालिकांची अखंडित अशी परंपरा निर्माण झाली. जसे मराठी नियतकालिक "मराठी ज्ञानप्रसारक" हे मुंबईच्या "उपयुक्त ज्ञानप्रसारक" संस्थेच्या विद्यमाने १८५० पासून सुरूझाले. हे मासिक १५/१६ वर्ष चालले होते. इंग्रजी भाषेतील भारदस्त अशा क्वार्टर्लीच्या धर्तीवर या मासिकाची आखणी करण्यात आली होती. मराठीतील दुसरे विख्यात त्रैमासिक "ज्ञानदर्शन" हे १८५४ मध्ये

www.ghrws.in

**ISSN 0976-9714**

*Variorum, Multi- Disciplinary e-Research Journal*
*Vol.-01, Issue-III, February 2011*

सुप्रसिद्ध वृत्तपत्रकार श्री भाऊ महाजन यांच्याच संपादकत्वाखली सुरू झाले. त्यांनी यापूर्वी दिग्दर्शन व "उपदेशचंद्रिका" चालविली होती. ज्ञानदर्शन या त्रैमासिकाच्या जुलै महिण्यात प्रसिद्ध झालेल्या पहिल्या अंकात श्री भाऊ साहेबांनी जी प्रस्तावना लिहिली ती वर्णिलेली परिस्थिती आजच्या घटकेसही तशीच कायम आहे.

तीन चार वर्षातच त्यांना आंतष्टयाचा व्यवहार सोडून द्यावा लागला. तिसरे नावाजलेले मासिक शालापत्र हे १८६१ मध्ये "पूणे पाठशालापत्राक" या नावाने प्रसिद्ध होत होते. त्यानंतर सुप्रसिद्धा अशा विविध ज्ञानविस्तार "मासिकाचा जन्म १८६७ □या □ुलैत झाला. याने कित्येक लेखकांना आणि कवींना लेखणप्रवण केले आहे. विस्तारापूर्वी मोठी किरकोळ २९ मासिक निघाली होती. अशी नोंद सापडते . न्यायाश्रय (१८६६) व वकिलांची साथी (१८६७), ही दोन कायद्यांचीच मासिके होती. त्याशिवाय ज्ञानोदय (१८४२) हरी केशवजी यांचे ताराप्रसारक (१८५०), प्रभोदय (१८५६) व सायंदीपिका (जुनी) - १८६१ ही ख्रिस्तीमन प्रचारक मासिके होती. विचारलहरी (१८५२), चंद्रिका (१८५४) व सदधर्मदिपीक (१८५६) ही तिन्ही मासिके हिंदू धर्माचा प्रसार करून ख्रिस्तीमत प्रचाराला विरोध करीत होती. विविधज्ञानविस्तार व निबंधमाला या दोन प्रमुख नियतकालिकांपूर्वी मराठी भाषेत अनेक नियतकालिके निघाली.

शं. ग. दाने सूचिमंडळाने १८०० ते १९५० या काळातील मराठी नियतकालिकांची सूची ग्रंथरूपाने प्रसिदध केलेली आहे. त्यावरून मराठी नियतकालिकांची परंपरा नजरेत भरते आणि स्वातंत्र्योत्तर काळात तिच परंपरा अतिशय समृध्दपणे टिकून राहिलेली दिसते. तालुका पातळीपर्यंत वृत्तपत्रे - नियतकालिके जाऊन विविध विषयांना सामाजिक आणि वाङमयीन चळवळींना वाहिलेली. वृत्तपत्रे नियतकालिके पाहिली की, या नियतकालिकांच्या भव्य परंपरेची साक्ष पटते.

***मराठी नियतकालिकांचे कार्य :***

प्राचीन काळापासून स्थितीशील, परंपराग्रस्त आणि धर्ममूलक जीवनपद्धती जगत आलेल्या भारतीयांना जीवनात ब्रिटिशकाळात परिवर्तन घडून आले. सांस्कृतिक बदल घडवून आणण्यास नियतकालिकांचे कार्य ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. महाराष्ट्रीय जीवनात मराठी नियतकालिकांची कामगिरी अतिशय मौलिक अशी ठरली आहे. या संदर्भात डॉ. हरिशचंद्र

www.gbrws.in

*Variorum, Multi- Disciplinary e-Research Journal*
*Vol.-01, Issue-III, February 2011*

निर्मळे यांनी लिहिले आहे की, "ख्रिस्ती मिशन-यांनी आपल्या धर्मप्रसारासाठी हिंदू धर्मातील विविध दोषांवर बोट ठेवले. हिंदूच्या आणि प्रामुख्याने दलितांच्या मनात हिंदू धर्मविषयी घृणा निर्माण करण्याची धडपड सुरू झाली आणि महाराष्ट्रातील जाणते विचारवंत खडबडून जागे झाले. त्यांनी नियतकालिकांकडे धाव घेतले आणि जातिभेद, अस्पृश्यता, विधवाविवाह, स्त्री शिक्षण या स्वसमाजातील समस्यांवर टीकेचे प्रहार केले. या सामाजिक विचारजागृतीमुळे सामाजिक परंपरागत रूढी, संकेत  चालीरिती अंधश्रद्धा आणि धर्मकल्पना यांना तडे जावू लागले. आता नवी संस्कृती निर्माण व्हावी, नव्या बाण्याची आणि नव्या विचारसरणीची मने तयार व्हावीत यासाठी सामाजिक सुधारणांना प्राधान्य मिळाले. त्यांचाही विचार चर्चा, मीमांसा नियतकालिकातूनच झाली. वास्तविक ग्रंथलेखनातूनही विचार प्रसार होत असला तरी विचार जागृतीचे सातत्य कायम टिकवण्यासाठी नियतकालिकेच अधिक समर्थ व उपयुक्त असतात, असा अनुभव आहे.

वृत्तविचारापेक्षाही ज्ञान प्रसार, मत प्रकटन आणि विचारजागृती ही नियतकालिकांची प्रमुख भूमिका घडवून आणेण, त्यातून धार्मिक विचार आचारात बदल घडवून आणणे हे त्यांचे उद्दिष्ट असते."

हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी बाळाशास्त्री जांभेकरांपासून तर सामाजिक सारं जीवन समर्पित करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापर्यंतच्या सर्व समाजधुरिणांची लोकशिक्षणासाठी समाजजागृती व विकासासाठी नियतकालिक हेच माध्यम निवडले. सभोवतालच्या जीवनाचा ऐहिक पातळीवर उहापोह करून लोकांच्या जगण्याला उत्कर्षाची दिशा देण्यासाठी त्यांच्यापर्यंत ज्ञान पोहोचण्याची महत्वाची कार्य "दर्पण" प्रमाणेच इतर नियतकालिकांनी केले सामाजिक वास्तवाचे परिमाण लोकांच्या मनावर बिंबवले त्यासाठी अनेक शास्त्र आणि कलांचा परिचय करून देण्यात आला विशेषतः अशिक्षित लोकांमध्ये जागृती घडवून त्यांच्यात अस्मिता निर्माण करणे आणि त्यांना ख-या अर्थाने स्वातंत्र्य मिळवून देणे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नियतकालिके सुरू केली. त्याचा १९३३ चा "जनताखास" हा अंक पाहिला की, त्याच्या मुखपृष्ठावर साखळदंडात जखडलेल्या गुलामाचे चित्र दिसते आणि त्या खाली "या गुलामगिरीच्या बेड्या मी अशा तोडून टाकणार" असे उदबोधक वाक्य नजरेस पडते.

**ISSN 0976-9714**

www.ghrws.in

*Variorum, Multi- Disciplinary e-Research Journal*
*Vol.-01, Issue-III, February 2011*

म्हणजेच सामाजिक चळवळ करीत असताना नियतकालिकांच्या माध्यमातून दलित समाजतात वैचारिक क्रांती घडवून आणण्याचे कार्य केलेले दिसते. त्याचप्रमाणे "बहिष्कृत भारताची नोंद घेता येते हे ‘बहिष्कृत भारत’ महाडाच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या पार्श्वभूमीवर सुरूझाले.

ज्ञानप्रकाश आणि विविध ज्ञानविस्तार यांच्या हेतू आणि प्रतिज्ञेकडे लक्ष वेधले की, त्यांची सामाजिक कामगिरी स्पष्ट होते. सामाजिक कार्याबरोबरच निबंधमालेसारखे नियतकालिक राष्ट्रीय कार्य करताना दिसतात. समाजातिल सर्वसामान्य लोकांना विचारप्रवृत्त करून त्यांच्या चिकित्सक बुद्धी वाढविण्यासाठी आणि स्वातंत्र्याची भावना निर्माण होण्यासाठी या नियतकालिकांनी साहित्य प्रसिद्ध केले. समाजप्रबोधनाकडून ती नियतकालिके वाङमयीन निर्मितीकडे वळले आणि वाङमयाची जडण-घडण होत गेली. म्हणून वाङमयाच्या दृष्टीने त्यांचे कार्य मोलाचे असेच आहे. हेच कार्य स्वातंत्र्योत्तर काळातील नियतकालिकांनी देखील जबाबदारीपूर्वक पार पाडलेले आहे. त्यात "अस्मितादर्श", "श्रावणी", "अक्षरवैदर्भी", "प्रतिष्ठान" इत्यादी पर्यंतची नियतकालिकांची महत्वाची भूमिका आहे.

***निष्कर्ष :***

१. अव्वल इंग्रजी काळात पाश्चात्य विद्या आणि शिक्षणाचा प्रसार झाल्यानंतर एतद्देशीय सुशिक्षितांना इंग्रजी साहित्याचा परिचय झाला त्यांच्या अनुशीलनातून त्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य लेखन करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या लेखनाला एक व्यासपीठ निर्माण करून देण्याचे कार्य नियतकालिकांनीच केले.

२. मराठी साहित्याच्या समृद्ध परंपरेत या खंडातील नियतकालिकांना विलक्षण महत्व प्राप्त झाले आहे. किंबहूना मराठी साहित्याची जडणघडण करणारे आधुनिक काळातील एक लक्षणीय माध्यम म्हणून नियतकालिकांकडे द्यावे लागते.

३. या काळातील नियतकालिकांमधून कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, निबंध यासारखे साहित्यप्रकार प्रसिद्ध करून वाचकांचे रंजन आणि उदबोधन करण्याचे कार्य केले. त्यामुळे समकालीन सर्वच नियतकालिकांतून मराठी वाङमयाला बहर आलेला दिसतो.

४. स्वातंत्र्योतर काळात सामाजिक पुनर्रचनेच्या विचाराने बदल घडून आले. विविध जाती जमाती संस्कृती पोट संस्कृती यांना त्यांच्या हक्क आणि अधिकाराची जाणीव झाली. लोकशाही

www.ghrws.in

**ISSN 0976-9714**

*Variorum, Multi- Disciplinary e-Research Journal*
*Vol.-01, Issue-III, February 2011*

राज्यघटनेने त्यांच्यात आत्मविश्वास आला. त्यांच्यात सामाजिक आणि चळवळी उभ्या राहिल्या त्यावेळी त्यांचा आवाज आणि विचार समाजपर्यंत पोहोचविण्यासाठी साहित्य हे जवळचे माध्यम वाटले आणि या साहित्याला प्रसिद्ध करण्यासाठी त्यांच्या जोडीत नियतकालिके धावून आली.

५. साठोत्तरी काळात दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य स्त्रीवादी साहित्य , ख्रिश्न मुस्लिम साहित्य या साहित्य प्रवाहाचा विचार केला तर त्या-त्या साहित्य प्रवाहातील चळवळीचे नियतकालिक प्रसिद्धा होतांना दिसतात.

६. स्वातंत्र्योतर काळात लोकशही मूल्यप्रमाणाली अस्तित्वात आल्याने खेडयापाडयापर्यंत शिक्षणाचा ग़र मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. खेड्या पाड्यातील आणि तळागाळातील माणसांना शिक्षण मिळू लागले. त्यांच्यातील शिक्षण घेत असलेल्या तरूण पिढीला मराठी वाङमयाच्या इतिहासात त्यांच्या जीवनाचे दर्शन होईनासे झाले. त्यावेळी त्यांला स्वतःचे जीवन साहित्यातून मांडाविसे वाटले अशा वेळी त्यांनी नियतकालिकातून मोठया आत्मविश्वासाने लेखन केले.

***संदर्भग्रंथसूची :***

१. मराठी विश्वकोश : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - मराठी विश्वकोश खंड ८ म.रा.सा.सं.मं. मुंबई प्र. आ. प्रक्र. ६४७.

२. मराठी नियतकालिकांचा वाङमयीन अभ्यास : डॉ. कुलकर्णी प्र. ०४

३. कानडे रा. गो. उ. नि. पृष्ठ ६५५

४. डॉ. हरिशचंद्र निर्माळे : दलितांची नियतकालिके, सुगावा प्रकाशन, पुणे प्र. आ. प्र.क्र. ०३

www.ghrws.in